17-04-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 04/16/2025 10:54 PM Page 1




आत्महत्येच्या खोडसाळ माहितीमुळे आपत्कालीन सेवांची फजिती » पान ३ वर


आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com


पंजाबने मोहन बागानला २-० ने हरवून मुलांचा किताब पटकावला » पान ४ वर


वेर्णा, गुरुवार, १७ एप्रिल २०२५ । पाने ४ । ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 224 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 17 April 2025 | Pages 4 | ₹ 4


# नेरुळ पुलाजवळील ३३ दुकाने जमीनदोस्त

## मासळी बाजारासह विविध स्टॉल्स हटवले : न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई

■ टीम दैनिक हेराल्ड :

**कळंगुट, दि. १६ : सार्वजनिक बांधकाम विभागाने बुधवारी नेरुळमधील नेरुळ-कांदोळी पुलाच्या परिसरात असलेली एकूण ३३ बेकायदेशीर बांधकामे जमीनदोस्त केली. या कारवाईमध्ये मासळी बाजार, भाजीपाला स्टॉल्स, रेस्टॉरंट्स आणि इतर व्यावसायिक आस्थापनांचा समावेश होता. मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मोठ्या प्रमाणावर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.**



सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता कार्मिनो मस्कारेन्हास यांनी माहिती दिली की, सदर जमीन राज्य सरकारच्या मालकीची असून ती रस्ता रुंदीकरणासाठी अधिग्रहित करण्यात आली आहे. या जागेवरील बांधकामे बेकायदेशीर असून, ती हटविण्याचे आदेश न्यायालयाकडून प्राप्त झाले आहेत. संबंधित बांधकामधारकांना जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून एक वर्षापूर्वीच नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. जानेवारीमध्ये वृत्तपत्रांद्वारेही सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या, असे मस्कारेन्हास यांनी स्पष्ट केले.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी अतिक्रमण झाल्यामुळे वाहतूक कोंडी आणि अपघातांचे प्रमाण वाढल्याचेही त्यांनी नमूद केले. लोक या ठिकाणी वाहने पार्क करून खरेदी करत असत, त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता, असे त्यांनी सांगितले. काही दुकाने मागील १० वर्षांहून अधिक काळ तिथे कार्यरत होती.



या कारवाईमध्ये नेरूळमधील मासळी मार्केटही जमीनदोस्त करण्यात आले. पारंपरिक मच्छीमारांना मासळी विकता यावी आणि सुरक्षित ठेवता यावी यासाठी हे मार्केट बांधण्यात आले होते. अनेक स्थानिक शेतकरी देखील आणि मासेमारी करणारे याठिकाणी आपले उत्पादन विक्रीस ठेवत होते. आता त्यांच्यासाठी पर्यायी व्यवस्था नाही, अशी प्रतिक्रिया काही स्थानिक विक्रेत्यांनी व्यक्त केली.

स्थानिकांनी न्यायालयाच्या आदेशाचा सन्मान व्यक्त करताना शासनाच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आम्ही पारंपरिक मच्छीमार आहोत, परंतु समुद्रात बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या मोठ्या ट्रॉलर्सवर कुठलीही कारवाई होत नाही, असे एका स्थानिक मच्छीमाराने सांगितले.

तसेच, नेरुळमधील सीआरझेड नो-डेव्हलपमेंट झोन आणि शेती क्षेत्रात असंख्य अनधिकृत बांधकामे आहेत. त्यांच्याविरोधातही न्यायालयाचे आदेश आहेत, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, असा आरोपही स्थानिक मच्छीमारांनी केला आहे.

# फातोर्डा-मडगाव टर्मिनस कागदावरच

- उभारणीसंदर्भात प्रश्नचिन्ह
- बस टर्मिनस अजूनही प्रतिक्षेतच

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. १६ :** विविध राजकीय पक्षांच्या आणि सरकारांच्या अनेक घोषणांनंतरही मडगाव शहराचा सर्वांगीण विकास अद्याप प्रत्यक्षात उतरताना दिसत नाही. विशेषतः फातोर्डा-मडगाव अल्ट्रा-मॉडर्न बस टर्मिनससारखा अत्यावश्यक प्रकल्प अजूनही कागदावरच असून त्याच्या उभारणीसंदर्भात नागरी समाजात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी अलीकडेच मडगावच्या विकासासाठी वचनबद्ध असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित केले. मात्र, सध्या अस्तित्वात असलेला केटीसी बस स्थानक परिसर आणि त्या ठिकाणी प्रस्तावित नव्या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये फारसा प्रगतीशील बदल दिसून येत नाही.

मडगाव केटीसी बस स्थानकाची स्थिती बरीच वर्षे अत्यंत दयनिय होती. १९८५ मध्ये बांधण्यात आलेले हे स्थानक जवळपास चार दशके एका तात्पुरत्या आणि धोकादायक अवस्थेतील शेडखाली कार्यरत होते. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गोवा दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर येथे तत्काळ 'फेसलिफ्ट' करण्यात आले. जीर्ण संरचनेत बदल करून परिसराला तात्पुरता हॉटमिक्स कोट देण्यात आला होता, परंतु हे बदल केवळ त्यांच्या 'विकसित भारत रॅली'च्या तयारीपुरतेच मर्यादित राहिले.

२०११ साली दसऱ्याच्या मुहूर्तावर तत्कालीन मुख्यमंत्री दिगंबर कामत यांनी या प्रकल्पाच्या पायाभरणीचा विधी पार पाडला होता. त्यावेळी त्यांनी प्रस्तावित अल्ट्रा-मॉडर्न बस टर्मिनससाठी दिल्लीतून सल्लागार नियुक्त करून आराखड्याचे नियोजन करण्याची घोषणा केली होती. मात्र, तब्बल १३ वर्षांनंतरही या प्रकल्पाला भौतिक स्वरूप मिळालेले नाही.

कामत यांनी नुकतीच माहिती देताना सांगितले की, त्यांनी संबंधित केंद्रीय मंत्र्यांशी यासंदर्भात चर्चा केली असून केंद्र सरकारकडून अंतिम निर्णयाची प्रतीक्षा आहे. २०२२ मध्ये परिवहन मंत्री माविन गुदिन्हो यांनी विधानसभेत सांगितले होते की, राज्य सरकार सार्वजनिक-खाजगी भागीदारी मॉडेलच्या माध्यमातून हा प्रकल्प राबविण्याचा विचार करत आहे. मात्र, त्यानंतरही या दिशेने ठोस पावले उचललेली दिसून आलेली नाहीत. मडगावसारख्या वाढत्या शहराला दर्जेदार आणि आधुनिक बस स्थानकाची अत्यंत आवश्यकता आहे. आता येथील लोकप्रतिनिधींनी ठोस निर्णय घेण्याची वेळ आली आहे,अशी प्रतिक्रिया साल्सेटमधील रहिवासी अँथनी फर्नांडिस यांनी दिली.तर, मडगाव-पणजी मार्गावर नियमित प्रवास करणारे प्रवासी प्रसन्न नाईक म्हणाले, प्रत्येक दिवशी येथे शेकडो स्थानिक व आंतरराज्य प्रवासी ये-जा करतात. हे स्थानक प्रवाशांच्या मूलभूत गरजांसह सुसज्ज असायला हवे. दशके उलटून गेली, घोषणांची मालिका सुरूच आहे, परंतु मडगावच्या प्रवाशांसाठी अत्याधुनिक सुविधांनी युक्त बस टर्मिनस अजूनही प्रतिक्षेतच आहे. नागरिक आणि प्रवाशांच्या अपेक्षा वाढत असतानाच, या प्रकल्पाला प्रत्यक्षात आणण्यासाठी आता निर्णायक पावले उचलण्याची आवश्यकता असल्याचे मत सर्वत्र व्यक्त होत आहे.

# निवडक

## न्यायाधीश गवई होणार सरन्यायाधीश

नवी दिल्ली, दि. १६ : सर्वोच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ न्यायाधीश बी. आर. गवई ५२ वे सरन्यायाधीश होणार आहेत. विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी बुधवारी केंद्रीय कायदा मंत्रालयाकडे न्यायमूर्ती बी. आर. गवईंच्या नावाची पुढील सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस केली आहे. न्यायमूर्ती गवई १४ मे रोजी ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतील. विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना १३ मे रोजी निवृत्त होणार आहेत. २४ मे २०१९ पासून न्यायमूर्ती बी. आर. गवई सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्ती कार्यरत आहेत. त्यांनी सरन्यायाधीश पदाची शपथ घेतल्यानंतर सहा महिने त्यांचा कार्यकाळ असेल. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी ते निवृत्त होतील. न्यायमूर्ती बी. आर. गवई मुळचे महाराष्ट्रातील आहेत. त्यांचा जन्म अमरावती जिल्ह्यात झाला आहे. १६ मार्च १९८५ रोजी त्यांनी वकिलीला सुरुवात केली. ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ पर्यंत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी वकील म्हणून त्यांची नियुक्ती झाली.

-----------------

## वक्फ कायद्याला स्थगितीस नकार

नवी दिल्ली, दि. १६ : केंद्र सरकारच्या वक्फ सुधारणा कायद्याविरुद्ध बुधवारी सर्वोच्च न्यायालयात दोन तास सुनावणी झाली. या कायद्याविरुद्ध १०० हून अधिक याचिका दाखल झाल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने या मुद्द्यांवर केंद्राकडून उत्तर मागितले आहे, परंतु न्यायालयाने कायद्याच्या अंमलबजावणीला स्थगिती दिलेली नाही. वक्फ कायद्याच्या निषेधार्थ देशभरात होत असलेल्या हिंसाचाराबद्दल सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली. यावर एसजी म्हणाले की, दबाव आणण्यासाठी हिंसाचाराचा वापर केला जाऊ शकतो असे वाटू नये. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती पीव्ही संजय कुमार, केव्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे.
केंद्राच्या वतीने सॉलिसिटर जनरल (एसजी) तुषार मेहता युक्तिवाद करत आहेत. तर कपिल सिब्बल, राजीव धवन, अभिषेक मनु सिंघवी, सीयू सिंग हे कायद्याच्या विरोधात युक्तिवाद करत आहेत. आता सर्वोच्च न्यायालय गुरुवारी दुपारी २ वाजता या प्रकरणाची सुनावणी करेल.

----------

## नेपाळमध्ये भूकंपाचे धक्के

काठमांडू, दि. १६ : म्यानमार आणि तिबेटनंतर आता नेपाळमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजीनुसार, नेपाळमध्ये झालेल्या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.० इतकी होती. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाले नाही. मात्र यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नेपाळमध्ये पहाटे ४:३० वाजता भूकंपाचे धक्के जाणवले. तसेच जपानमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले. ज्याची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.६ इतकी होती. दरम्यान, याआधी २८ मार्च रोजी थायलंड आणि म्यानमारमध्ये आलेल्या ७.७ रिश्टर स्केल भूकंपामुळे मोठे नुकसान झाले होते. यामध्ये ३ हजारांहून अधिक लोक मृत्युमुखी पडले होते आणि हजारो लोक बेपत्ता झाले होते. हिंदुस्थानने म्यानमार आणि थायलंडला सर्वतोपरी मदत केली. तसेच काही दिवसांपूर्वी तिबेटमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले होते.

### हवामान

कमाल : ३३ किमान : २५
आर्द्रता : ६९

### बाजार भाव

सोने : ₹ ९७,२५० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,००,००० (१किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७७,०४४ .७७ ↑ (३१.१६ )
निफ्टी : २३,४३७.९० ↑ (८३.९५)

# काँग्रेसकडून 'ईडी'च्या कारवाईचा निषेध

## नेतृत्वाला लक्ष्य करण्यासाठी रचलेली राजकीय खेळी असल्याचा आरोप

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १६ :** नॅशनल हेराल्ड प्रकरणात काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इतर वरिष्ठ नेत्यांविरुद्ध अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या आरोपपत्राविरोधात गोवा काँग्रेसने बुधवारी तीव्र निषेध नोंदवला.

गोवा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अमित पाटकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, ३६५ दिवसांच्या कालमर्यादेच्या अखेरच्या दिवशी म्हणजेच ९ एप्रिल २०२५ रोजी दाखल करण्यात आलेले आरोपपत्र हे केवळ कायदेशीर कारवाई नसून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वाला लक्ष्य करण्यासाठी रचलेली राजकीय खेळी आहे.

पाटकर म्हणाले की, गांधी कुटुंबाने देशासाठी दिलेले योगदान विसरता येणार नाही. अशा राजकीय जादूटोण्यांनी त्यांना गप्प करता येणार नाही. काँग्रेस पक्ष देशातील प्रत्येक नागरिकासाठी द्वेष, अन्याय आणि हुकूमशाहीविरोधात निर्भयपणे आवाज उठवत राहील. ते पुढे म्हणाले की, केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार बेरोजगारी, महागाई, महिलांवरील अत्याचार, बलात्कार, खून यांसारख्या गंभीर समस्यांवरून जनतेचे लक्ष हटवण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया करत आहे. काँग्रेस नेत्यांवर खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत आणि तपास यंत्रणांचा गैरवापर करून विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप पाटकर यांनी केला. विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी देखील सरकारवर टीका करताना म्हटले की , विरोधकांवर खोट्या केसेस दाखल करून त्यांना गप्प बसवण्याचा किंवा भाजपमध्ये सामील होण्याचा दबाव टाकण्याचे हे पद्धतशीर षड्यंत्र आहे.

गोवा प्रदेश महिला काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ. प्रतीक्षा खलप यांनी भाजप सरकारवर टीका करताना सांगितले, भारताच्या सेवेत आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या गांधी कुटुंबाविरुद्धचा हा सुनियोजित राजकीय हल्ला आहे. मात्र, आम्ही अशा दबावाच्या युक्त्यांना कधीही झुकणार नाही. सत्य, न्याय आणि संविधानाच्या रक्षणासाठी काँग्रेसचा लढा ठामपणे सुरूच राहील.

# बेकायदेशीर बांधकामप्रकरणी सुनावणी १३ जूनपर्यंत तहकूब

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १६ :** राज्यातील बेकायदेशीर बांधकामे आणि अतिक्रमणांविरोधात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेच्या सुनावणीदरम्यान गोवा सरकारसह विविध स्थानिक स्वराज्य संस्थांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाकडे अनुपालन अहवाल सादर करण्यासाठी अधिक कालावधीची मागणी केली. न्यायालयाने ही विनंती मान्य करत पुढील सुनावणी १३ जून २०२५ रोजी घेण्याचे निर्देश दिले.

बुधवारी झालेल्या सुनावणीदरम्यान राज्याचे महाधिवक्ता देविदास पांगम यांनी न्यायालयाला माहिती दिली की, शासन सध्या याआधी दिलेल्या न्यायालयीन आदेशांचा आढावा घेत असून, राज्यभरातील अनधिकृत बांधकामांची गंभीर समस्या सोडवण्यासाठी ठोस कार्ययोजना तयार करण्याच्या प्रक्रियेत आहे. संबंधित उपाययोजना लवकरच न्यायालयात सादर केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या जनहित याचिकेची दखल न्यायालयाने स्वतःहून घेतली असून, राज्यातील अनियंत्रित आणि कायदाविरोधी विकासाकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले आहे. यामुळे स्थानिक आणि राज्य पातळीवरील नियामक व अंमलबजावणी यंत्रणांची कार्यपद्धती न्यायालयीन तपासणीच्या केंद्रस्थानी आली आहे.

६ मार्च २०२५ रोजी न्यायालयाने दिलेल्या आदेशात, अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी काही महत्त्वाचे आणि सर्वसामान्य स्वरूपाचे निर्देश जारी करण्यात आले होते. त्यानुसार, सर्व ग्रामपंचायती आणि नगरपरिषदा यांनी सर्वोच्च न्यायालयाने ठरवलेल्या प्रक्रियेचे पालन करत नियमितपणे पाडकाम मोहिमा राबवाव्यात, अशा सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच मुख्य सचिवांना या मोहिमा प्रभावीपणे राबवण्यासाठी आवश्यक कार्यपद्धती ठरवून स्थानिक स्वराज्य संस्थांना मार्गदर्शन करण्याचे आदेश देण्यात आले होते. दरमहा स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या अधिकारक्षेत्रातील बेकायदेशीर बांधकामांचे सर्वेक्षण करून त्यावर कारवाईपूर्वी सविस्तर अहवाल तयार करावा आणि तो संबंधित प्रशासकीय पोर्टलवर सार्वजनिक स्वरूपात प्रकाशित करावा, अशीही सक्त सूचना न्यायालयाने केली आहे.

अशा अहवालांच्या आधारे न्यायालय बेकायदेशीर बांधकामांना मूक संमती देणाऱ्या अथवा त्यांच्या विरोधात योग्य कारवाई करण्यात अपयशी ठरलेल्या अधिकाऱ्यांवर वैयक्तिक जबाबदारी निश्चित करणार असल्याचे संकेत दिले आहेत.


दरम्यान, मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी यापूर्वी झालेल्या उच्चाधिकार समितीच्या दोन बैठकींचे अध्यक्षस्थान भूषवले असून, सरकार कोणत्याही परिस्थितीत बेकायदेशीर बांधकामांना नियमित करण्याचा विचार करत नसल्याचे स्पष्ट केले आहे. यासोबतच, उत्तर व दक्षिण गोवामध्ये प्रत्येकी एक असे दोन स्वतंत्र पाडकाम पथक स्थापन करण्यात आले असल्याची माहितीही त्यांनी दिली होती.

# भोम बायपास प्रकल्पामुळे फक्त ४ घरे, १६ दुकाने बाधित

## सार्वजनिक बांधकाम विभागाचा खुलासा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**फोंडा, दि. १६ :** भोम येथील बायपास प्रकल्पाला स्थानिकांकडून तीव्र विरोध होत असतानाच, या प्रकल्पामुळे गावाचे पारंपरिक सौंदर्य, मंदिरे आणि सांस्कृतिक वारसा नष्ट होईल, असा दावा केला जात आहे. मात्र, राष्ट्रीय महामार्ग विस्तारामुळे केवळ चार घरे आणि १६ दुकाने बाधित होतील, असा पुनरुच्चार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी केला आहे.



फोंड्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता (राष्ट्रीय महामार्ग) सतेंद्र भोबे यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, भोम येथील महामार्गाच्या विस्तारीकरणाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) व भूसंपादन आराखडा ग्रामसभेत सादर करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत वैशाली हॉटेल ते मुस्लिमवाडा दरम्यान उड्डाणपूल उभारण्यात येणार असून, हा चार पदरी महामार्ग खोर्ली ते ओल्ड गोवा या टप्प्यापर्यंत विस्तारित केला जाईल.

हा प्रकल्प सुमारे १०६० कोटी रुपयांचा असून चालू आर्थिक वर्षात त्यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच बाणास्तारी येथे नवीन पूल उभारण्यात येणार असल्याचेही भोबे यांनी सांगितले. उड्डाणपूल उभारणीदरम्यान भोम येथील मंदिरे व तलाव यांना कोणतीही हानी पोहोचणार नाही, असा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे. फक्त चार घरे व १६ दुकाने बाधित होतील आणि त्यांना योग्य त्या भरपाईसह पुनर्वसनाची तरतूद करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. रस्त्याच्या कडेला असलेल्या तलावाचे संरक्षण करण्यासाठी उड्डाणपुलाचे खांब योग्य ठिकाणी उभारले जातील.

रस्त्याकडेला असलेल्या सतीदेवी मंदिरावर परिणाम होणार का, असा प्रश्न विचारल्यावर सहाय्यक अभियंता चंद्र पवार यांनी सांगितले की, मंदिर सुरक्षित असून ते रस्त्याच्या विस्तारीकरणातून वाचेल. मात्र, अत्यावश्यकतेनुसार काही बदल करावे लागल्यास त्यावर पुढील निर्णय घेतला जाईल.

या प्रकल्पासाठी आवश्यक असलेले संरेखन २०२३ पासूनच निश्चित करण्यात आले असून, संबंधित जमीनमालकांना याबाबत माहिती देण्यात आली आहे, असेही सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्ट केले. खोर्ली परिसरात देखील काही घरे बाधित होणार असून, त्यांची संख्या मर्यादित असल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले.

भोम येथील प्रकल्पाला स्थानिकांकडून होणाऱ्या विरोधाबाबत विचारले असता, भोबे म्हणाले, प्रत्येक व्यक्तीला आपले विचार मांडण्याचा अधिकार आहे. आम्ही कोणाला थांबवू शकत नाही. हा विरोध त्यांचा वैयक्तिक दृष्टिकोन आहे. आमच्याकडून आम्ही डीपीआर तयार करणाऱ्या सल्लागारासोबत स्थानिकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. या प्रकल्पासंदर्भात स्थानिक आमदार आणि कला व सांस्कृतिक मंत्री गोविंद गावडे यांच्या उपस्थितीत ग्रामस्थांना प्रकल्पाची माहिती देण्यात आली. त्यांना प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या रचना प्रत्यक्ष दाखवण्यात आल्या. गावडे यांनी देखील खोर्ली परिसरात फक्त काहीच घरे बाधित होणार असल्याची माहिती दिली.या महामार्गाचे विस्तारीकरणाचे काम पावसाळ्यानंतर फोंडा ते भोम या टप्प्यावर सुरू होणार आहे. यासाठी निविदा प्रक्रिया व कामाचे आदेश पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष काम हाती घेतले जाईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.